लेडीज फर्स्ट

सक्सेस मंत्रा

# जिवापाड मेहनत महत्त्वाची

मनोरंजनाचे क्षेत्र म्हणजे फक्त नाटक, चित्रपट, मालिका एवढंच नाही. यापलीकडेही या क्षेत्राची व्याप्ती आहे. सूत्रसंचालक, निवेदन, एकपात्री प्रयोग, मिमिक्री, गेम शो यांसारखे अनेक प्रकार आहेत. मी कटाक्षाने एकपात्री प्रयोगांवर लक्ष केंद्रित केले. महिला आणि लहान मुलांसाठी स्वतंत्र छोटेखानी संहिता लिहिल्या. 'लाफ्टर शो' करताना 'हास्यसम्राट' या मालिकेत संधी मिळाली. तेव्हापासून काही वैशिष्ट्यपूर्ण, विविधांगी शो सुरू आहेत.

एकपात्री प्रयोगात कोणतेही नेपथ्य किंवा अन्य रंगमंचीय साधनसामग्री लागत नाही. दुसरी बाब म्हणजे नाटकात प्रत्येक वेळी आपल्याला मुख्य भूमिका मिळेलच असे नाही. मात्र, एकपात्री प्रयोगात आपणच फोकस असतो. त्यामुळे त्याच्या यश-अपयशाची जबाबदारी आपलीच असते. लहान मुलांसाठी रंगभूमीवर विशेष कार्यक्रम होताना दिसत नाही. त्यासाठी काय करता येईल, याचाच मी विचार करते. सध्या बाहुल्यांच्या मदतीने 'पपेट शो'ची तयारी सुरू आहे. ललित कला केंद्रातून नाट्यशास्त्र विषयात शिक्षण घेतल्यावर आपण काहीतरी करावं, ही इच्छा होती. त्यातूनच नवीन प्रयोग करत आहे. मनोरंजनाच्या क्षेत्रात मुलींना खूप संधी आहे. त्यासाठी आवश्यकता आहे ती प्रोत्साहनाची. चौकटीबाहेरचा विचार आणि जिवापाड मेहनतीची तयारी ठेवल्यास या क्षेत्रात नक्कीच चांगली संधी आहे.



- चैत्राली माजगावकर-भंडारी